# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

**साहेबरावजी बुट्टपाटील स्मृती व्याख्यानमाला**

सकाळ
मंगळवार,
२ फेब्रुवारी २०१६
४

# आई-वडिलांना द्या सर्वोच्च प्राधान्य : लहाने

**राजगुरुनगर, ता. १ :** ''प्रत्येकाने आपल्या जीवनात आई-वडिलांना सर्वोच्च प्राधान्य देऊन त्यांना अभिमान वाटेल असे जीवन जगायला हवे, यातच आपला उत्कर्ष आहे,'' असे आवाहन प्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ. विठ्ठल लहाने यांनी केले.



डॉ. लहाने

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबराव बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'जीवनातील प्राधान्य' या विषयावर डॉ. लहाने बोलत होते. या वेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य जी. बी. शिंदे, प्रा. ए. जी. कुलकर्णी, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. लहाने म्हणाले, ''मी माझ्या आयुष्यातील प्राधान्यक्रम ठरवताना माझे आई-वडील, माझे रुग्ण आणि जे भविष्यातील देशाचे आधारस्तंभ आहेत, असे विद्यार्थी यांना महत्त्वाचे स्थान दिले आहे. सर्वांनी आई-वडिलांना प्रेम द्या. त्यांची सेवा करा. स्वतः कष्ट करून आपल्या आई-वडिलांना मोठे करा. त्यांची सामाजिक उंची वाढवा. कोणीही आपल्या आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवू नका.''

आईने त्यांच्या मोठ्या भावाला म्हणजे डॉ. पद्मश्री तात्याराव लहाने यांना जी किडनी दिली त्याचा अनुभवही त्यांनी या वेळी सांगितला. 'जगात एवढे फक्त आपली आईच करू शकते, दुसरे कोणीही नाही,' असे भावनिक उद्गार त्यांनी काढले. डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले, तर सायली घुले हिने आभार मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख